28-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/27/2025 10:42 PM Page 1




साळ नदीचे झाले गटार; त्वरित कारवाईची मागणी पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



पाकिस्तानविरुद्ध बांगलादेश सामना रद्द पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 176 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 28 February 2025 | Pages 4 | ₹ 4

# एप्रिल शैक्षणिक वर्ष रद्द करा; पालक एकवटले

## शिक्षण संचालकांना निवेदन सादर

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २७ : गोव्यातील विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० (एनईपी ) ची सदोष अंमलबजावणी आणि एप्रिलमध्ये शालेय वर्ष सुरू करण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला आहे. पालकांनी शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांना निवेदन सादर करून हा निर्णय तत्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. पालकांचे म्हणणे आहे की, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याचा एनईपीचा उद्देश त्यांना मान्य आहे. मात्र, गोव्यातील अंमलबजावणी प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असून ती विद्यार्थ्यांच्या गरजांसाठी अपुरी ठरत आहे. त्यामुळे पालक आणि पालक-शिक्षक संघटनांनी आपल्या मागण्यांचे निवेदन शिक्षण संचालनालयाकडे पाठवले आहे.**



याबाबत सामाजिक कार्यकर्त्या सेसिल रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले की, शालेय वेळापत्रकात अचानक बदल करून विद्यार्थ्यांना एप्रिलपासून शाळेत पाठवणे बंधनकारक करण्याच्या निर्णयामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. एनईपी २०२० आणि राष्ट्रीय शालेय शिक्षण अभ्यासक्रम फ्रेमवर्क -२०२३ च्या तत्त्वांना हा निर्णय विरोधाभासी आहे. त्या पुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांना विश्रांती न देता २८ मार्चला परीक्षा संपल्यानंतर लगेचच १ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करणे हे विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी धोकादायक ठरेल.

पालकांच्या म्हणण्यानुसार सरकारने हा निर्णय घेताना पालकांशी कोणताही संवाद किंवा सल्लामसलत केली नाही , शिवाय अपुऱ्या पायाभूत सुविधा, उष्ण हवामानाचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम, एनईपी च्या समग्र विकासाच्या उद्दिष्टांशी विसंगत निर्णय, अभ्यासक्रमातील अचानक बदलांमुळे विद्यार्थ्यांवरील वाढलेला अभ्यासाचा ताण, नववीच्या विद्यार्थ्यांच्या पदोन्नतीबाबत स्पष्ट मार्गदर्शनाचा अभाव, विसंगत भाषा धोरण.

शालेय वर्ष बदलण्याच्या निर्णयासाठी कोणतेही ठोस कारण नसणे या अनेक समस्या अजूनही सुटलेल्या नाहीत. त्यामुळे एप्रिलमध्ये शाळा सुरू करण्याचा निर्णय मागे घेऊन पारंपरिक पद्धतीने जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू करावे, अभ्यासक्रमातील वाढती भार टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना मानसिक तणावातून मुक्त

पान २ ▶



# कंटेनरला धडकून अपघात; २५ वर्षीय युवकाचा मृत्यू

टीम दैनिक हेराल्ड

▶ **धारबांदोडा राष्ट्रीय महामार्गावर अपघात : रिक्षाचालक जखमी**

फोंडा, दि. २७ : धारबांदोडा येथे राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या कंटेनरला मालवाहू रिक्षा धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात २५ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर रिक्षाचालक गंभीर जखमी झाला आहे.

गुरुवारी पहाटे बाणस्तारी येथील भाजी विक्रेता सनित चंद्र गीताल (मूळ पश्चिम बंगाल) आणि रिक्षाचालक उत्तम गवळी हे भाजीपाला खरेदीसाठी बेळगावच्या दिशेने निघाले होते. दरम्यान, दुर्गिणी येथे उभ्या असलेल्या कंटेनरला रिक्षाची धडक बसली. या अपघातात सनितचा जागीच मृत्यू झाला, तर रिक्षाचालक उत्तम गवळी गंभीर जखमी झाला.

नरसिंह यादव (मूळ उत्तर प्रदेश) हा चालक जीए ०६ टी ४१९५ क्रमांकाचा कंटेनर घेऊन वास्कोहून बेळगावच्या दिशेने जात असताना दुर्गिणी येथे त्याच्या वाहनाचा टायर पंक्चर झाला. त्यामुळे त्याने कंटेनर महामार्गावरच थांबवला होता. मात्र, कंटेनरच्या पार्किंग दिवे सुरू नसल्याने आणि महामार्गावर दाट अंधार असल्याने हा अपघात घडल्याची चर्चा घटनास्थळी होती. अपघात होताच स्थानिकांनी जखमींना तातडीने धारबांदोडा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती सनितला मृत घोषित केले, तर उत्तम गवळी यांना प्राथमिक उपचारानंतर घरी पाठवण्यात आले. फोंडा अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी रिक्षाचे छत कापून सनितला बाहेर काढले, मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.

सनित हा गेल्या काही वर्षांपासून बाणस्तारी येथे भाजी विक्री व्यवसाय करत होता. तो आपल्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. अपघाताची माहिती मिळताच कुटुंबियांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.

फोंडा पोलिसांनी या प्रकरणी अपघाताची नोंद घेतली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी मडगाव रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. कंटेनर महामार्गावरच उभा करण्यासंबंधी आणि पार्किंग दिवे सुरू नसल्याबाबत अधिक तपास सुरू आहे.

# वटवृक्ष कोसळला! सुदैवाने जीवितहानी नाही

▶ **फोंडा आपत्ती व्यवस्थापन पथकाचे दुर्लक्ष : दुकानांच्या छतांचे नुकसान**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**फोंडा, दि. २७ :** भोम येथे ६०० वर्षे जुने वडाचे झाड अखेर कोसळले. केवळ नशीब बलवत्तर म्हणून हे झाड कोसळताना मोठी दुर्घटना टळली. त्यामुळे स्थानिक आणि विक्रेत्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. बाणास्तरी मार्केटमधील शेडवर हे प्राचीन झाड गुरुवारी मध्यरात्री १.३० वाजता कोसळले. सुदैवाने, कोणतीही जीवितहानी झाली नाही. स्थानिक नागरिक हे झाड वडदेव' म्हणून पूजत होते आणि त्याला लहान मंदिरही जोडलेले होते.

गुरुवार हा बाजाराचा प्रमुख दिवस असल्याने, या घटनेपूर्वीच झाड कोसळल्याने मोठा अनर्थ टळला. यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, घुमटी तसेच बाजारातील काही दुकानांचे मोठे नुकसान झाले आहे. स्थानिकांनी सांगितले की, दरवर्षी या वडाच्या झाडाच्या सन्मानार्थ दोन नाटके सादर केली जातात.

या घटनेनंतर भोम गावाचे सरपंच दामोदर नाईक यांनी फोंडा आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, मागील सहा महिन्यांपासून पंचायतीकडून हे वडाचे झाड तोडण्यासाठी अनेक निवेदने देण्यात आली होती. झाड वयोमानामुळे सुकले होते आणि धोका निर्माण करत होते. मात्र, वारंवार विनंती करूनही आपत्ती व्यवस्थापन पथकाने कोणतीही कारवाई केली नाही.

पंचायतीकडे झाड तोडण्याचा खर्च उचलण्याची आर्थिक क्षमता नव्हती, त्यामुळे आम्ही अधिकृतरीत्या आपत्ती व्यवस्थापन पथकाकडे मदत मागितली होती. मात्र, त्यांच्या

पान २ ▶

# २० टक्के थकबाकी भरण्याचे न्यायालयाचे आदेश

## पायाभूत सुविधांसाठी अर्ज करण्यास गतिशक्ती संचार पोर्टल खुले

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २७ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने केबल ऑपरेटर्सना वीज विभागाच्या प्रलंबित थकबाकीपैकी २० टक्के रक्कम भरण्याचे आदेश दिले आहेत. २०२२ मध्ये दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीत ऑल गोवा केबल टीव्ही ऑपरेटर्स अँड सर्व्हिस प्रोव्हायडर्स असोसिएशनने वीज विभागाच्या शुल्कविषयी आक्षेप घेतला होता. न्यायालयाने आता केबल ऑपरेटर्सना २० टक्के रक्कम जमा करण्यास सांगत, त्यांनी दिलेली एकूण रक्कम आणि ऑपरेटर्सची यादी वीज विभागाला सादर करण्याचा आदेश दिला आहे.

दरम्यान, भारत सरकारच्या दूरसंचार विभागाने सर्व सुविधा पुरवठादारांना (दूरसंचार व इंटरनेट सेवा प्रदाते) माहिती दिली आहे की, १५ फेब्रुवारी २०२५ पासून गतिशक्ती संचार पोर्टलद्वारे वीज विभागाच्या पायाभूत सुविधांचा वापर करण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येईल. या सुविधेमुळे गोव्यातील इंटरनेट नेटवर्कमध्ये सातत्याने येणाऱ्या अडचणी आणि केबल कटिंगमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर निश्चित तोडगा मिळण्याची अपेक्षा आहे.

दूरसंचार (राईट ऑफ वे) नियम, २०२४ अंतर्गत सर्व अर्ज ऑनलाइन प्रक्रियेद्वारेच स्वीकारले जाणार आहेत.पूर्वी हार्ड कॉपीद्वारे अर्ज केलेल्या सुविधा पुरवठादारांनाही या पोर्टलद्वारे अर्ज करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वीज विभाग या अर्जांची छाननी करून आवश्यक शुल्क भरल्यानंतर योग्यतेनुसार मंजुरी देईल. सुविधा पुरवठादार आणि वीज विभाग यांच्यातील समन्वय सुलभ करण्यासाठी विभागाने उत्तर आणि दक्षिण गोवा येथे स्वतंत्र नोडल अधिकारी नेमले आहेत.

पान २ ▶

**PRIME INDUSTRIAL PLOTS FOR AUCTION IN GOA**

Unleash your business potential in the most strategic location of Goa

गोंय उद्देगीक विकास म्हामंडळ
Goa Industrial Development Corporation

**SECOND CALL**

REF No. GIDC/24-25/03 | Dated: 02/12/2024

INDUSTRIAL PLOTS - VERNA INDUSTRIAL ESTATE

| SN | Plot No. | Area of Plot (in $m^2$) |
|---|---|---|
| 1 | I-34 | 9905 |
| 2 | I-65 | 3110 |

| SN | Event Description | For C-1 Plot at Verna Industrial Estate |
|---|---|---|
| 1 | Release of eAuction Document and opening of registration on NIC eAuction portal | 27/02/2025 |
| 2 | Start date for submission of Bids | 27/02/2025 |
| 3 | Last date for submission of bids | 18/03/2025 |
| 4 | Evaluation of the bids | 20/03/2025 |
| 5 | Live eAuction of the plots | 20/03/2025 |

- The conditions for allotment of leasehold rights, will be governed by the Goa Industrial Development Corporation (Allotment, Transfer and Sub-Lease) Regulations, 2023, as notified in the Official Gazette of Government of Goa vide no. Goa-IDC/Reg/2023-23/3621 dated 7th December 2023. The Regulations can be downloaded from https://idc.goa.gov.in
- The Electronic Auction (eAuction) will be carried out on the NIC eAuction Portal, accessible at https://eauction.gov.in.
- Any person, intending to acquire leasehold rights to any of the plots offered in this notice, may participate in the eAuction by registering at the NIC eAuction Portal (https://eauction.gov.in).
- EAuction Document is available for viewing and/or downloading from the Corporation's bid posted on the eAuction Portal (https://eauction.gov.in) or Goa IDC website (www.idc.goa.gov.in)

**E-AUCTION HIGHLIGHTS**

- Simplified eAuction process via the India eAuction Portal.
- New Goa-IDC Regulations 2023 to enhance the ease of doing business.
- Bids will be placed on land premium only. The annual lease rent is set at a subsidized rate.

**GOA: GROWTH, OPPORTUNITIES AND ASPIRATIONS**

- Prime location on India's Western coast.
- Excellent connectivity via rail, road, port, and airport.
- The highest literacy and per capita income in the country.

CORPORATE OFFICE:
Plot No. 13A-2, EDC Complex,
Patto Plaza, Panjim - Goa. 403 001.

Website: idc.goa.gov.in
Email: goaidc1965@gmail.com
Tel.: 91-832-2437470 to 73

goa_idc
Goa Industrial Development Corporation - GIDC
goa_idc

# तुळशी गावाने केली 'यूट्यूब'द्वारे आर्थिक क्रांती

## राज्य सरकारने गावकऱ्यांसाठी स्थापन केला स्टेट आर्ट स्टुडिओ

**छत्तीसगड, दि. २७ :** छत्तीसगडमधील तुळशी गाव सोशल मीडियाच्या माध्यमातून क्रांती घडवत आहे. सुमारे चार हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील एक हजारांहून अधिक रहिवासी थेट यूट्यूबशी जोडले गेले आहेत. त्यामुळे तुळशी गावाला यूट्यूब विलेज' असेही ओळखले जाते.

गावात वेगवेगळ्या ठिकाणी तरुण आणि वृद्ध सोशल मीडिया कंटेंट तयार करताना दिसतात. हे चित्र केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नाही; यामुळे गावातील लोकांना आर्थिक स्वावलंबनही मिळाले आहे.गावातील महिलांना यूट्यूबमुळे आर्थिक संधी मिळत आहेत. आधी केवळ घरकाम आणि शेती करणाऱ्या महिलांना आता स्वतंत्र ओळख मिळत आहे. गावातील अनेक पुरुष आणि महिला या डिजिटल माध्यमातून लाखो रुपये कमावत आहेत. काहीजण फुलटाइम यूट्यूबर बनले आहेत, तर काहींनी चित्रपट आणि जाहिरातींमध्येही संधी मिळवल्या आहेत.

२०१८ मध्ये जय वर्मा आणि ज्ञानेंद्र शुक्ला यांनी बीइंग छत्तीसगढिया' नावाने यूट्यूब चॅनल सुरू केले. विनोदी आणि सामाजिक संदेश देणारे व्हिडिओ तयार करून त्यांनी लाखो दर्शक मिळवले. त्यांच्या व्हिडिओंमध्ये स्थानिक भाषा, जीवनशैली आणि गावातील समस्यांवर विनोदी पद्धतीने प्रकाश टाकला जातो. काही महिन्यांतच त्यांच्या चॅनलला १ लाखाहून अधिक सबस्क्राइबर्स मिळाले आणि आता त्यांचे व्हिडिओ २६ कोटींपेक्षा जास्त वेळा पाहिले गेले आहेत.

या यशाने गावातील इतर तरुणांना प्रेरित केले. आदित्य बघेलने स्वत:चे यूट्यूब चॅनल सुरू केले आणि एका वर्षात त्याला २० हजार फॉलोअर्स मिळाले. त्याने बीइंग छत्तीसगढियामध्ये लेखक आणि दिग्दर्शक म्हणून काम सुरू केले आणि आता तो रायपूरमधील एका प्रोडक्शन हाऊसमध्ये कार्यरत आहे.

पिंकी साहू ही तुळशी गावातील सर्वात लोकप्रिय महिला यूट्यूबर आहे. घरच्या आणि समाजाच्या विरोधाला न जुमानता तिने आपली ओळख निर्माण केली. तिच्या व्हिडिओंमुळे तिला

पान २ ▶

## निवडक

### आसाममध्ये भूकंपाचे धक्के

मोरीगाव, दि. २७ : आसाममधील मोरीगाव जिल्ह्यात गुरुवारी सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर ५.० तीव्रता नोंदवली गेली. गुवाहाटी आणि राज्याच्या इतर भागातही त्याचे धक्के जाणवले. आसामचा परिसर भारतातील सर्वात जास्त भूकंपग्रस्त भागांपैकी एक आहे. हे भूकंपप्रवण क्षेत्र त मध्ये स्थित आहे, म्हणजेच येथे तीव्र भूकंपाचा धोका जास्त असतो. आसाममधील मोरीगावमध्ये गुरूवारी पहाटे २:२५ वाजता भूकंप झाला. गेल्या काही वर्षांत या भागात अनेक मोठे भूकंप झाले आहेत. १९५० चा आसाम-तिबेट भूकंप (८.६ तीव्रता) आणि १८९७ चा शिलाँग भूकंप (८.१ तीव्रता) हे इतिहासातील सर्वात शक्तिशाली भूकंपांपैकी एक आहेत. २५ फेब्रुवारी रोजी बंगालच्या उपसागरात ५.१ तीव्रतेचा भूकंप झाला. त्याचे धक्के कोलकाता आणि पश्चिम बंगालच्या इतर भागातही जाणवले होते.

---------

### वक्फ विधेयकातील बदलांना मान्यता

नवी दिल्ली, दि. २७ : केंद्रीय मंत्रिमंडळाने वक्फ विधेयकातील प्रस्तावित बदलांना मान्यता दिली आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मांडले जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. वक्फ विधेयकात व्यवस्थापन करणाऱ्या केंद्रीय आणि राज्य वक्फ बोर्डांचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये ४४ बदल प्रस्तावित आहेत. केंद्र सरकार अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात संसदेत सुधारित विधेयक सादर होण्याची शक्यता आहे. वक्फ विधेयकाबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाने संयुक्त संसदीय समितीने म्हणजेच जेपीसीने केलेले १४ बदल स्वीकारले आहेत. अलिकडेच, विरोधकांनी जेपीसी अहवालाबाबत प्रश्न उपस्थित केले होते. त्यामध्ये त्यांनी सुचवलेल्या बदलाचा समाविष्ट नसल्याचा आरोप केला होता. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये लोकसभेत वक्फ विधेयक सादर केले. यानंतर ते 'जेपीसी'कडे पाठवण्यात आले होते.

--------------

### हिमाचल-उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टी

उत्तराखंड, दि. २७ : उत्तर भारतातील राज्यांमध्ये हवामान बदलले आहे. हिमाचल प्रदेशातील लाहौल स्पिती येथे गेल्या २ दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत आहे. अटल बोगदा रोहतांग येथे वाहनांची वाहतूक थांबवण्यात आली आहे. मनाली आणि शिमला या पर्यटन स्थळांमध्ये पाऊस आणि बर्फवृष्टी सुरूच आहे. उत्तराखंडच्या काही भागातही पाऊस पडत आहे. त्याच वेळी, हवामान खात्याने गुरुवारी देशातील १५ राज्यांमध्ये पावसाचा इशारा जारी केला आहे. यामध्ये दिल्ली, हरियाणा, चंदीगड, केरळमध्ये पाऊस पडत आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. येथे, काश्मीरमधील पहगुमार द्राबशाला येथे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले आहे, ज्यामुळे किश्तवाड-दोडा राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. अनेक पर्यटक अडकले आहेत. ढिगारा काढण्यासाठी अनेक लोक आणि यंत्रे पाठवण्यात आली आहेत. वाहतूक नियंत्रण युनिटकडून अपडेट मिळाल्यानंतरच लोकांना प्रवास करण्यास सांगण्यात आले आहे. गुरुवारी काश्मीर खोऱ्यात नवीन बर्फवृष्टी झाली.

### हवामान

कमाल : ३४ किमान : २६
आर्द्रता : ६५

### बाजार भाव

सोने : ₹ ८९,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,३०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७२,३६५ .७७↑ (४१.१३ )
निफ्टी : २०,२३५.९० ↑ (३३.९५)